SADBHAKTI PRAKASH

Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०. फोनः२८२४५२७२




(वर्ष ९५) आषाढ ते भाद्रपद – शके १९४५ – जुलै ते सप्टेंबर २०२३
(संयुक्तांक १० ते १२)

## : अनुक्रमणिका :

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल/वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री भाईंचे प्रवचन | ८ |
| ३) | सद्‌गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन | १७ |
| ४) | उत्सव – महोत्सवातील कार्यक्रम | २३ |
| ५) | शोकवृत्त | २७ |
| ६) | अमृतकण | २८ |
| ७) | निवेदन | ३० |
| ८) | शोकवृत्त | ३२ |

॥ श्री सद्‌गुरु प्रसन्न ॥



## - संपादकाचे बोल -

## (वर्षे ९५) चैत्र ते ज्येष्ठ (शके १९४५)

## (संयुक्तांक ७ ते ९)

## (एप्रिल ते जून २०२३)

९५व्या वर्षाचा सहा महिन्यांचा प्रवास करीत सद्‌भक्ति प्रकाशचा अंक शतकाकडे वाटचाल करीत आहे. श्री सद्‌गुरुच्या कृपेने शतकही पार होईलच ह्यात शंकाच नाही. सर्व सद्‌भक्तांनी

एकजुटीने सहकार्य करण्याची सद्बुद्धि सद्गुरुंनी द्यावी हीच त्यांना कळकळीची प्रार्थना आहे. त्यांच्या आशिर्वादाचा वरदहस्त तर आम्हांवर आहेच.

**(चैत्र मास)**

यावेळी मार्चमध्येच चैत्राची सुरुवात झाल्यामुळे वर्ष प्रतिपदा ते रामनवमीपर्यंत उत्सव तेव्हाच झाले.

बुधवार दि. २२.३.२०२३ (चैत्र प्रतिपदा)ला गुढीपाडवा होता. प्रातःस्मरणानंतर स्तवन व प्रार्थना झाली. रात्रौ ९ वाजता पालखी व मिरवणूक संपन्न झाली.

बुधवार दि. २९.३.२०२३ (चैत्र शुद्ध अष्टमी)ला श्री लक्ष्मण महाराज (इंदूर) यांच्या पादुका स्थापना दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. सांयकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले.

गुरुवार दि. ३०.३.२०२३ (चैत्र शुद्ध नवमी) रोजी श्री रामनवमी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. दुपारी १२ वाजता जन्मोत्सव साजरा झाला. त्याच दिवशी संत सोहिरोबा नाथ पुण्यतिथी दिन पण होता. जन्मोत्सवा पूर्वी श्री रामभक्तीपर पदे म्हणण्यात आली. नंतर पाळणा (१) बाळा जो जो रे कुलभूषणा । दशरथ नंदना।। (२) विश्व डोलारा

माजि आत्मा हरि ।। (३) राम दर्शनासि चला लाभ हा भला ।। (४) छत्र सिंहासनी अयोध्येराजा। नांदतसे माझा मायबाप।। आणि शेवटी (५) ज्याचे वंशी कुळधर्म राम सेवा। त्याचे वंशी मज जन्म देगा देवा ही प्रार्थना म्हणण्यात आली. तसेच टाकियाला निजभार रामा।। ही प्रार्थना पदे म्हटली गेली. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली.

गुरुवार दि. ९.४.२०२३ (चैत्र पौर्णिमा)ला श्री हनुमान जयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ६.३० वाजता श्री हनुमान जन्मोत्सव साजरा झाला. रात्रौ ९ वाजता पालखी व मिरवणूक निघाली.

मंगळवार दि. १८.४.२०२३ (चैत्र वद्य त्रयोदशी) रोजी श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी होती. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

गुरुवार दि. २०.४.२०२३ (चैत्र अमावस्या) रोजी सद्गुरु पार्वतीमाता जयंती दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

**(वैशाख मास)**

शुक्रवार दि. २१.४.२०२३ (वैशाख प्रतिपदा) रोजी सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले. ठराविक सद्भक्तांनी

सुमधुर पदे म्हटली.

शनिवार दि. २२.४.२०२३ (वैशाख शुद्ध तृतीया) रोजी अक्षय्य तृतीया व श्री परशुराम जयंती होती. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ पार पडला.

मंगळवार दि. २५.४.२०२३ (वैशाख शुद्ध पंचमी) ला आद्य शंकराचार्य व श्री रामानुचार्य जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली.

## श्री वामन पंडित पुण्यतिथ्योत्सव

बुधवार दि. २६.४.२०२३ (वैशाख शुद्ध षष्ठी) रोजी श्री वामन पंडितांची पुण्यतिथी होती. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्था झाली. ११.३० वाजता एकादशमी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रुप धरिले ओजा। पाहुणा सद्गुरुराजा आला वो माये।। (३) अनेक जन्मेसाधन करिता। आकळेना मुक्ति जे।। (४) आम्ही जाणो हरिचे पाय।। (५) गोविंदा, गोपाळा मज तारि। भवनदी भयंकर वाटे भारी (६) सद्गुरुराया चुकवी जन्म मरण (७) तारि मज जगदंब।। (८) गोविंद घ्या बाई, गोपाळू घ्या गे। माधव घ्या बाई। दामोदर घ्या गे।। (९) ध्याता सूत कामिनी, ध्याता दिन यामिनी। घडी एक तरी आठवा राम।। (१०) आनंद मनी हा

झाला। पाहता श्री पद वामन कमळाला।। (११) वंदुनि भावे तव पादुका या। अर्पिन भावे मन आणि काया (१२) जय वामन श्री वामन जय जय वामन म्हणू आम्ही आता।। (१३) तुमच्या चरणा मागो हेचि दान। होऊती प्रसन्न द्यावे आम्हा ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले. सायंकाळी ५.३० वाजता 'श्री वामन पंडितांचे वैराग्य' या प्रवचन वाचनाचा प्रारंभ झाला. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली. भजनी मंडळाच्या टाळ गजरात सर्वांनी पालखीचा आनंद घेतला.

गुरुवार दि. २७.४.२०२३ (वैशाख शुद्ध सप्तमी)ला सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले. त्यावेळी सुमधुर पदे म्हणण्यात आली.

शुक्रवार दि. २८.४.२०२३ (वैशाख शुद्ध अष्टमी – श्री दुर्गाअष्टमी) रोजी सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ झाला. रात्रौ ८ वाजता शेजोत्सव संपन्न झाला.

शनिवार दि. २९.४.२०२३ (वैशाख शुद्ध नवमी)ला सायंकाळी ६ वाजता ध्वनि मुद्रित पदांचे श्रवण झाले. नंतर उत्सव समाप्ती झाली व सद्गुरुंनी सेवा मान्य करून घ्यावी ही कळकळीची प्रार्थना करण्यात आली.

शुक्रवार दि. ४.५.२०२३ (वैशाख शुद्ध चतुर्दशी) रोजी श्री

नृसिंह जयंती होती. सायंकाळी ५ वाजता गु. बं. सदाशिव उभयकर यांच्याकडून भजनाचा कार्यक्रम झाला.

## गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव

गुरुवार दि. १८.५.२०२३ (वैशाख शुद्ध चतुर्दशी) रोजी श्री बाबांची पुण्यतिथी होती. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) म्यां शंकर पुजिला, भावे पुजिला।। (४) शंकर भोळा हो भोळा (५) येई येई गुरुराज आज। झडकरि मज तारी (६) हरि तुझी भक्ति मला देई (७) धांव दयाघन, धांव कृपाघन। धांव समर्था विश्वपते (८) टाकी कुळश्रेष्ठ शंकरा। घ्या पदरी पामरा।। (९) आणि शेवटी करि ऐसे सद्गुरु देवराया।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण संतर्पण झाले. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले. त्यावेळीही गुरुवर्य श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण झाले. 'पितापुत्र व गुरुशिष्य प्रेम' या प्रवचन वाचनास प्रारंभ झाला.

शनिवार दि. २०.५.२०२३ (ज्येष्ठ प्रतिपदा) दिवशी सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन झाले व हळदीकुंकू समारंभ झाला. त्याच दिवशी समाप्ती दिन होता. गुरुवर्यांनी आम्हा

बालकांची सेवा मान्य करून घ्यावी ही कळकळीची विनंती करण्यात आली.

**(ज्येष्ठ मास)**

शनिवार दि. २०.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध दशमी) रोजी श्री गंगावतरण दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

बुधवार दि. ३१.५.२०२३ (ज्येष्ठ शुद्ध एकादशी – निर्जला एकादशी) रोजी श्री निवृत्तिनाथ पुण्यतिथी दिन होता. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

**– इति –**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः।।

# श्री गुरुवर्य श्री भाईंचे प्रवचन

**२१.१२.१९३१**

**''नमः पार्वतिपते हर हर महादेव।।**
**सीताकांत स्मरण जय जय राम।।**
**पुंडलीक वर दे हरि विठ्ठल।।**
**श्री गुरुदेव दत्त।।''**

गेल्या आठवड्यात नारायणांचे जे भागवतात वर्णन केले आहे. त्याचे वाचन आपल्या ह्या मंदिरात झाले व त्या संबंधाने मी श्री रामेश्वर मंदिरात नित्यक्रमाप्रमाणे सोमवारी चार शब्द बोललो. परंतु त्या दिवशी थोडीच मंडळी हजर होती, म्हणून तोच विषय आपण आज पुन्हा घेऊ.

'नारायण' शब्दाचा अर्थ असा आहे :- 'नर' म्हणजे जीव

आणि 'नार' म्हणजे 'जीवांचा समुदाय' व 'अयन' म्हणजे आधार. तेव्हा सर्व जीवांना आधारभूत असणारा जो, तो 'नारायण.' सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी एक निर्विकार, निर्गुण असे चैतन्य होते. त्याच्या ठिकाणी एक स्फूर्ती उठली की, ''मीच जगद्रूपें करून होईल.'' तोच सृष्टिचा उत्पत्ति काळ :-

''ज्याचे नि उपजे उत्पत्ति । त्याचे नि अंगे स्थितीसी स्थिती।
ज्याचे नि प्रलया प्रलय शक्ति । ऐसा जो त्रिजगतीं मुरव्य हेतू।।
यापरी जो जगाचे हेतू । स्वयेह स्वसत्ता हेतु रहितु।
सच्चिदानंद सदोदितु । जो जाण निश्चितु नारायण।।''

ह्या नारायणाच्या वर्णनाचे सार आपल्या नित्य भजन क्रमांतील 'नमः पार्वती पते हर हर महादेव' वगैरे चार नमनात आले आहे.

आता आपण ह्या चार नमनांचा क्रमशः विचार करू :- ''नमः पार्वती पते हर हर महादेव।।'' नारायणांची अनंत नामे व रूपे आहेत. त्यापैकी ही चार नावे व रूपे आहेत. नारायणाने नाम व लीला निर्माण करून आमचा कोणत्या रीतीने उद्धार केला, ह्या संबंधाने आज विचार करावयाच नाही, तर नारायणाने जी चार निरनिराळी रूपे धारण केली व ज्यांचा ह्या नमनात उल्लेख आला आहे. त्या संबंधाने बोलावयाचे आहे. ''नमः पार्वती पते हर हर माहदेव'', ह्या नमनांत चारच शब्द आहेत. त्यात 'नमः' म्हणजे नमन, अर्थात् मनन-मनरहित होऊन लीन होणे. असा नमस्कार महादेवाला म्हणजे सर्व देवात श्रेष्ठ जो देव त्याला केला आहे. आणि त्या महादेवाला म्हणजे शिवाला नमस्कार करावयाचा म्हणजे त्याच्या स्वरूपात मन लीन करावयाचे, नाहीसे करावयाचे.

त्याच्या स्वरूपात मन लावावायचे म्हणजे ''शीव ची होऊनी शिव हा भजावा । शिवरुपीं मन लावा।।'', ''शिवो भूत्वा शिवं यजेत।।'' हे शिवाचे खरे भजन, पूजन अथवा नमन.

विषयाचे विशेष विवेचन करण्यापूर्वी महादेव म्हणजे कोण हे पहिल्याने समजले पाहिजे. तेव्हा आपण पहिल्याने धर्माच्या तत्त्वाला धरून याचा विचार करू. सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी एक निखिल, निराकार, निर्गुण चैतन्य होते तो महादेव. ज्याप्रमाणे प्रत्येक घराण्याचा एक मूळ पुरुष असतो व त्याच्यापासून त्या घराण्याचा विस्तार होतो. त्याप्रमाणे ह्या विश्वाच्या विस्ताराचा मूळ पुरुष, निर्गुण, चैतन्य रुपी प्रत्यगात्मा शिव-महादेव होय. त्याचे पहिल्याने आपणला दर्शन झाले पाहिजे. म्हणून सोहिरोबा म्हणतात :- ''त्या देवाचे तू दर्शन घे. संसार मोहातूनि त्वरित निघे।। त्या देवांचे०।।'' म्हणे सोहिरा शून्याकार, रूप नाही आकार। परब्रह्म निर्विकार, आत बाहेर अवघे।। त्या देवांचे०।। हा महादेव आणि ह्याच्यापासून इतर देवाचं व सर्व सृष्टिची उत्पत्ति झाली :- ''ज्या पासूनि ॐकार ही जाहला। ब्रह्मा विष्णु हर ते तिघे।। त्या देवांचे०।।''

आता ह्या महादेवाच्या स्वरूपात लीन का व्हावयाचे म्हणाल तर तेथे साक्षित्व करण्याला प्रकृति नसते. ती त्या स्वरूपात लीन असते. प्रकृति म्हणजे पार्वती. हिमालय पर्वताची मुलगी. अशा अतिशय उंच, गगनचुंबीत पर्वताची मुलगी आपणाला कशी दिसणार? अर्थात् ती शिवाच्या स्वरूपात अदृश्य रूपाने असते. याचा पारमार्थिक अर्थ असा की सद्गुरुपासून स्वरूपाचा बोध

होतो, तेव्हा मनरहित आपली वृत्ती प्रकृतीसह निर्गुण स्वरूपात लीन होते. 'हर हर' याचा अर्थ ही 'निर्गुण' परच आहे. कारण तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे 'हरि' आणि 'हर' यांच्या स्वरूपात फक्त वेलांटीचाच फरक आहे. वेलांटी म्हणजे प्रकृति-पार्वती. ती निर्गुण स्वरूपात गुप्त आहे. पण हीच वेलांटी 'हरि' या शब्दात प्रगट आहे. 'हरि' म्हणजे 'विष्णू' - राम - 'सीताकांत' ही वेलांटी अर्थात् पार्वती - पर्वताची मुलगी - जी गुप्त होती. तीच पुढे सीता रूपाने प्रगट झाली. सीता भूमीत सापडली अर्थात दृश्य झाली. सारांश निर्गुण चैतन्य रूपी हर ह्यांचे शुद्ध सात्त्विक प्रकृतीशी ऐक्य झाले की तो सगुणेश्वर विष्णू - राम झाला. आणि त्याचे नमन करिताना आपण :- ''सीताकांत स्मरण जय जय राम'' असे म्हणतो. ह्यात शिवालाच राम नावाने संबोधिले आहे. कारण ''पहिले निर्गुण (ब्रह्म) । ब्रह्मचि ईश्वर सगुण।।'' हर म्हणजे निर्गुण ब्रह्म, ह्याला वेलांटी दिली की हरि म्हणजे सगुणेश्वर होतो, अर्थात निर्गुण ब्रह्म आणि शुद्ध सात्त्विकी प्रकृति किंवा माया - पार्वती, सीता मिळून सगुणेश्वर 'राम' झाला. पार्वती जी निर्गुण स्वरूपात अव्यक्त होती, ती सीता रूपाने व्यक्त झाली. म्हणून दुसऱ्या नमनांत 'सीताकांत स्मरण' असे म्हटले आहे.

आता शिवाला नमः हा शब्द योजिला आहे, आणि दुसऱ्या नमनात 'सीताकांत स्मरण' असे म्हटले आहे. यावरून तुमच्या सहज लक्षात येईल की या दोन नमनात बराच भेद आहे. सद्गुरुने जे स्वरूप दाखविले त्याचे स्मरण ठेविले पाहिजे. ते स्मरण जागृत

राहण्यास एकच उपाय आहे की सीताकांतच्या म्हणजे सगुण ईश्वराच्या लीला गाणे व ऐकणे. ह्या उपायाचा उल्लेख 'जय जय राम' ह्या चरणाने केला आहे. हाच आशय तुकाराम महाराजांनी 'ध्यानी रूप वाचे नाम निरंतर। आपुला विसर पडो नेदीं।।' ह्या चरणात केला आहे. सगुण स्वरूपाचेच स्मरण, श्रवण, कीर्तन होऊ शकेल. निर्गुणाचे वर्णन करणे शक्यच नाही :- ''वर्णिल कोण गुण वर्जित निर्गुणाला'' त्याने शुद्ध सत्त्व गुणाचा अवलंब केल्यामुळे त्याचे वर्णन करिता येते. ह्या शुद्ध सात्त्विक मूळ मायेने – ईश्वर शक्तीने दुसरी इच्छा धारण केली की :- 'एकोऽहं' – मी एकटी आहे. 'बहुस्याम्' – मी जगद्रूपें करून होईन. ''बहुस्याम् म्हटल्याबरोबर तिला काय कमी आहे. ईश्वराचीच शक्ती ती'':- ''राजयाची कांता काय भीक मागे। मनाचिया जोगे सिद्धि पावे।।'' तिच्या इच्छा मात्रे करून विश्वाची उभारणी झाली. आता हे तिसरे प्रकरण उत्पन्न झाले :- ''एक ब्रह्म निर्गुण.'' दुसरे ''ब्रह्मचि ईश्वर सगुण'', व तिसरे ''ब्रह्मचि विश्व त्रिगुण'' तोच हा ''विठ्ठल – धुडींराज'' :- ''विश्वगार रूप शारदा होऊनि। मोह तू घालूनि धुंडिराजा।।'' पहिला निर्गुण शिव – महादेव, दुसरा शुद्ध सत्त्व युक्त चैतन्य – सीताकांत – राम व तिसरा विठ्ठल.

''पुंडलीक वर दे हरि विठ्ठल।''

पुंडलीक म्हणजे जीव. ह्या जीवाचा अशी हकिकत आहे की, तो आपल्या आईबापाला म्हणजे सीताकांत रामाला – सगुण ईश्वराला विसरून नाना तऱ्हेचे आचार व कर्मे करू लागला. योग याग यात्रा वगैरे करू लागला. एकदा तो काशी

यात्रेला जात असता कुक्कुट नामक ऋषीच्या आश्रमात आला. तेथे रात्री वस्ती करून पुढे जाण्याचा त्याचा विचार होता. मध्य रात्रीच्या सुमारास तीन काळ्या ठिक्कर बायका आश्रमात आलेल्या त्याला दिसल्या. त्यांनी आश्रमात जाऊन त्या ऋषीचे चरण तीर्थ आपल्या अंगावर प्रोक्षण केले. त्या सरशी त्यांना दिव्य देह प्राप्त झाले. हे पाहताच पुंडलिकाने त्याचे पाय धरले. त्यावर त्या म्हणाल्या, ''अरे, तू आई-बापांचा छळ करणारा महापापी आहेस, म्हणून तू आम्हाला शिवू नकोस. आम्ही पवित्र गंगा, यमुना व सरस्वती आहोत. आम्ही सर्व जगताचें पाप घेतो. म्हणून आमचे स्वरूप त्यांच्या पातकांमुळे काळे ठिक्कर पडते. ते आम्ही संतांच्या दर्शनाने व तीर्थ प्रसादाने पूर्ववत दैदिप्यमान करून घेतो. हा प्रकार पाहून पुंडलिकास पश्चात्ताप झाला आणि गंगा, यमुना व सरस्वती ह्यांच्या सांगण्यावरून संतांची योग्यता किती असते हे त्याला समजून आले व सत्संगतीचा लाभ प्राप्त होण्यासाठी प्रथम माता पितरांची सेवा उत्तम केली पाहिजे. हे त्याला कळून चुकले. आईबाप म्हणजे 'सीता राम' असे बुद्धिस पटल्यावर त्यांचे तो स्मरण करू लागला.''

साधक अथवा मुमुक्षु भगवंतांचे, सीतारामाचे, हरीचे स्मरण करू लागला म्हणजे मायेचे काही चालत नाही :- ''स्मरता नित्य हरि। मग ते माया काय करी।। करूणाकर वर दायक जो हरि। ठेवितो हात शिरीं।।'' अशा रीतीने पुंडलिक आईबापांची सेवा करू लागल्यावर, विठोबाने त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याला दर्शन दिले. पण विठोबाला त्या रूपाने त्याला बोध देता येईना.

उदाहरणार्थ जरी विठोबा नामदेवांशी बोलत असत, खेळत असत व जेवीत असत, तरी अनुभवजन्य ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी त्याला विसोबा खेंचरालाच शरण जाण्यास सांगितले :-
''नाम्याचे उगऊनि कोडें। धाडी विठोबा विसोबा कडे।।''
वास्तविक विठोबाचे दत्त, राम, शिव आहे. पण बोध करण्याची कामगिरी दत्ताकडेच दिली आहे. राम कृष्णादि अवतार बोध करण्याकरिताच झाला आहे. कलियुगात ज्यांना ज्यांना अनुभव जन्य ज्ञान झाले आहे. त्यांना ते दत्तापासूनच झाले आहे.

हिंदु धर्मांतच दत्त उपासनेची कल्पना आहे असे नाही, तर सर्व धर्मांत ही कल्पना आहेच असे पुढील उताऱ्यावरून कळून येईल :- ''ही त्रिमूर्तींची कल्पना केवळ हिंदुधर्मालाच चिकटून आहे असे नाही, तर ती या पृथ्वीवरील इतर मोठमोठ्या धर्मांना ही सोडता येत नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आर्यधर्माच्या शेजारी जो पारशी धर्म आहे, त्यात ही अग्नि, उदक व सूर्य ह्या त्रयींच्या द्वारे देवाधि देव जो अहुर मझ्द याची प्राप्ति होते व ही तीन रूप या सर्वेश्वराचा साक्षात्कार पटवितात असे मानिले आहे. हिंदुधर्माचे पहिले भावंडं व पुढे ज्याशी त्याची भाऊबंदकी झाली, त्या बौद्ध धर्माला ही या त्रयीची कल्पना मानवली. बुद्ध धर्म व संघ या त्रयीस प्रत्येक बौद्ध धर्मियाने शरण गेले पाहिजे अशी या धर्माची सक्त आज्ञा आहे. तद्धर्मीय अशोक याने उभारलेल्या स्तंभावर ही या आज्ञेचा उल्लेख केला आहे. हिंदु लोक अनेक देवातंची पूजा करितात, तथापि ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रयींत सगळ्या देवातांचा समावेश होतो. तसेच सर्व

सुजाण हिंदु खरा देव अनादि अनंत एकच असल्याचे मानतात असे सुमारे ८०० वर्षांपूर्वी आल्बेरूनीने वर्णिले आहे. त्याने या त्रिमूर्तींची तुलना ख्रिस्ती धर्माच्या त्रिमूर्तींच्या कल्पनेशी जुळवून दिली आहे. ख्रिस्तानुयायी परमेश्वराचे अस्तित्व पिता (देव), पुत्र (ख्रिस्त), व पवित्र आत्मा (होली घोस्ट) या तीन स्वरूपात मानतात (आर्यांचे सण - ऋग्वेदी).''

म्हणून आपल्या चार नमनात :- ''गुरुदेव दत्त'' असा उल्लेख करून दत्ताला नमन केले आहे. त्या गुरुदेवाची प्रसन्नता झाल्यावर तो अनुभवजन्य ज्ञान देतो, म्हणजे महादेवाचे - निर्गुण स्वरूपाचे दर्शन देववितो. त्यालाच आपण पहिले नमन केले आहे :- ''नमः पार्वती पते हर हर महादेव।।'' नंतर तेच निर्गुण स्वरूप चराचरांत व्यापून उरले आहे :- ''ब्रह्म निर्गुण। ब्रह्मचि ईश्वर सगुण।।'' तोच सीताकांत आणि त्याचे स्मरण, ''सीताकांत स्मरण जय जय राम'' ह्या नमनात केले आहे. पुढे तोच सगुण ईश्वर विश्व त्रिगुण या रूपाने नटला :- ''ब्रह्मचि विश्व त्रिगुण।।'' त्याचेच स्मरण ''पुंडलिका वरदा हरि विठ्ठल'' ह्या नमनांत केले आहे.

सारांश दत्त देव तिन्ही ब्रह्माचा अनुभव देतो. नंतर त्या गुरुदेव दत्ताची यथा योग्य उपासन केल्यावर शिष्यच दत्त - भगवान होतो :- ''आपणची सगुण साक्षी म्हणोनि। निराकार आत्मा सगुणत्वें ओळखोनी। कृत कृत्य होतो।।'' म्हणजे दत्त होतो. त्या दत्ताचेंच आपण ''श्री गुरुदेव दत्त'' ह्या नमनाने स्मरण करतो. म्हणून श्री रामेश्वर मंदिरात शिव लिंग आहे, त्याला

आपण पाहिल्याने :- ‘‘नमः पार्वती पते हर हर महादेव’’ म्हणून नमन करितो. नंतर वरच्या बाजूस राम सीता आहेत त्यांचे ‘‘सीताकांत स्मरण जय जय राम’’ असे स्मररण करितो. नंतर देवळात ज्या दुसऱ्या देवता आहेत व ज्या रामच जगद्रूपें करून झाला आहे. त्याचें ‘‘पुंडलिक वरदा हरि विठ्ठल’’ असे स्मरण करितो आणि बाहेरच्या बाजूस दत्ताची मूर्ती आहे त्याचे ‘‘श्री गुरुदेव दत्त’’ ह्या नमनाने स्मरण करितो.

**: नारायण :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**रविवार : ३.५.४३**
**सकाळी : ९ ते ९.३५**

आज हुबळीला जावयाचे आहे. संतदर्शनाचा लाभ म्हणजे हा एक सुयोगच आहे. एकदा नारदाने श्रीकृष्णाला विचारले की संतदर्शनाचे महात्म्य काय? भगवान म्हणाले एक दिवस सांगेन. तो दिवस आला तेव्हा भगवंताने सांगितले नारदा, आज तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो. पहा समोरच्या झाडावर एक पोपट आहे त्याला हे विचार. त्याप्रमाणे त्याने पोपटाला विचारताच तो पोपट झाडावरून उडाला व चरणावर येऊन पडला व पंख फडफडून मेला. तेव्हा नारद म्हणाले भगवंता समजले. संतदर्शनाचे माहात्म्य

म्हणजे मरण. तेव्हा आता आम्ही कोणाला दर्शन द्यायला जाऊच नये. झाले. भगवान म्हणाले, थांबा जरा अजून तुला समजले नाही. नंतर काही दिवसांनी म्हणाले की तो समोर सरडा आहे त्याला विचार नारदांनी तसे विचारताच तो सरडा एकदम पडला तो कायमचाच. मग नारदांची खात्री झाली की संतदर्शनाचा परिणाम मरणच. भगवंताला तसे त्यांनी येऊन सांगितले पण ते म्हणाले अजून धीर धर. xxx एका राजाकडे जा. त्याला बहुभाग्याने व नव्या नवसाने एक मुलगा झाला आहे त्याला विचार. नारद म्हणाले, भगवंता वा, आम्हाला फाशी पाडण्याचा बेत आहे का? भगवान म्हणाले तसे कसे होईल? तुला अनुभव येण्यास सांगतो काही होणार नाही जा. नंतर नारद त्या राजाकडे गेले. राजाला फार आनंद झाला. कारण आनंदाच्या वेळीच ते आले. मग त्यांची पाद्यपूजा केली तेव्हा नारद म्हणाले, राजा तुझ्या आताच झालेल्या पुत्राला मी पाहू इच्छितो. राजाला थोडा संशय वाटला. पण तसाच तो गेला. राणीसाहेब कडक होत्या. तरी पण त्याने तिला सांगितले की बाहेर नारदमुनी आले आहेत व ते बाळाला पाहू इच्छितात. बहुभाग्याने झालेला त्याला संतदर्शन झाले. म्हणजे त्याचे भाग्य काय विचारावे? पण राणी म्हणाली काय? तुम्ही त्या जोगड्याच्या नादी लागता? त्या बालकाला बाहेर वारा वगैरे लागेल. तो पुष्कळ सांगतो त्याला काय मुलाची किंमत? पण तुम्ही कसे हे ऐकता? राजा परत आला तो खिन्न दिसत होता. तेव्हा नारद म्हणाले ओळखले. काय राणी नाही म्हणते ना? तिला जाऊन सांग की मुलाला आणले नाही तर

त्याला भस्म करीन. राणीला हे समजताच ती घाबरली व म्हणाली वारा लागून ब्राँकायटीस होऊन मरणार व नाहीतर हा भस्म करील असो. मग तिने त्याला गरम कपडे गुंडाळून बाहेर पाठविले. नारदाने कमंडलुतील पाणी त्याच्यावर शिंपडले तेव्हा ते बालक हासू लागले. हा चमत्कार पाहून राणी चकीतच झाली. मग नारद म्हणाले, अरे बालका भगवंताच्या आज्ञेने मी संतदर्शनाचे माहात्म्य काय हे विचारण्यास आलो आहे. तो बालक म्हणाले, काय सांगू? आपले प्रथम दर्शन पोपटाच्या देहात असताना मिळाले आपल्या दर्शनाने तो देह सोडून मी सरडा झालो. त्या देहांत आपले दर्शन होताच त्या योनीतून मी मुक्त होऊन मला हा दिव्य देह मिळाला. आता आपले दर्शन झाले तेव्हा ह्यापुढे आता पुनर्जन्म नाही. नारदाला हे उत्तर ऐकून समाधान वाटले व मग ते राजाला म्हणाले, तुझा मुलगा भाग्यवान आहे. तो परम भागवत होणार तुमच्या सर्व कुळाचा उद्धार करील. मग नारदाने ही बातमी भगवंताला जाऊन सांगितली तेव्हा संतदर्शनाने पापयोनीतून मुक्त होऊन मनुष्ययोनी येईल व मग तेथे सत्संगत मिळाला असता हा कायमचा मुक्त होईल. पण ही सत्संगत बहुभाग्याशिवाय मिळणार नाही.

**कोटिजन्माची पुण्य संपत्ति। जरी आयती असेल गांठी।**
**तरीच जोडे माझ्या संतांची संगती। सत्संगे भक्ति उल्हासे।।**
**(ए.भा.)**

आज महत्‌भाग्य म्हणून संतदर्शनाचा लाभ होणार. सांगलीचे कोटणीसमहाराज आमच्या बरोबर भोगांवी बेळगावला येणार

होते. ते उत्तम कीर्तनकार, प्रवक्ते आहेत. पण त्यांना आमच्या संगतीत आनंद होतो असे ते म्हणतात. ह्या खेपेला त्यांना काही कारणास्तव येता येत नाही म्हणून पत्र आले आहे.

श्यामरावला पहा आज जावेच लागेल. हेच प्रारब्ध कित्येक प्रारब्ध नाही म्हणतात पण सर्वांची इच्छा, त्यांची स्वतःची इच्छा असून राहता येत नाही ह्याला काय म्हणावे? स्वतःला अनुभव आला म्हणजे प्रारब्ध न मानणारे मग मानू लागतात. एकदा कारवारला श्रीबाबांकडे एक गृहस्थ संस्कृतच्या परीक्षेसाठी आले होते. त्यावेळी श्रीभाई B.A.ला बसले होते. ते नापास झाले तेव्हा श्रीबाबा म्हणाले, ''प्रारब्ध आहे.'' पण ते गृहस्थ म्हणाले कसले प्रारब्ध? अभ्यास केला नाही म्हणून नापास झाला. नंतर त्या गृहस्थाची परीक्षा झाली. पुष्कळ अभ्यास केलेला. पण तेही नापास झाले. घरी आल्यावर म्हणाले एवढी मेहनत केलेली फुकट गेली. श्रीबाबा म्हणाले का? नापास कसे झाले? ते म्हणाले प्रारब्ध माझे. आता मला ते पटले. श्रीभाईंच्या वेळी पटले नाही स्वतःला अनुभव आला तेव्हा पटले. तेव्हा –

**कर्मानुरुप सकलांसही बुद्धि होते।**
**ज्ञात्यासही तदनरुपची वागविते।।**

ज्ञानी, विद्वान मनुष्य असला तरी प्रकृतीप्रमाणे करतो. डॉ. भाऊदाजी सर्वांना उपदेश करणारे की bubblesच्या मोहात पडू नका. पण त्यांच्यावरच एक असा प्रसंग आला. तो बबल दुसऱ्या दिवशी burst होणार होता व आदल्या दिवशी त्यांच्याकडे एकजण आला व म्हणाला तुम्ही नुसता शब्द द्या उद्या ते

विकायचे. त्यांनी शब्द दिला व दुसऱ्याच दिवशी तो xx झाला. त्यांचे मित्र मोठमोठे होते. त्यांनी सर्व व्यवस्था केली पण त्यावेळी हा वेदांतच उपयोगी पडला. ते दार वगैरे लावून आत बसले व काही केल्या दार उघडेना. सर्व मित्र बाहेर बसले होते. श्रीबाबा त्यांचे मित्र तेव्हा त्यांना भेटायला गेले व सांगितले, ''मी शंकर आलो आहे दार उघड.'' त्याबरोबर त्यांनी दार उघडले. इतर कोणाला दाद दिली नाही. पण त्यांना आत घेतले. श्रीबाबा म्हणाले, ''हे काय तुम्ही चालविले आहे? तुमच्या मित्रांनी सर्व व्यवस्था केली आहे. तुमचा धंदा उत्तम चालतो. तुम्हाला काय ते पैसे म्हणजे हाताचा मळ आहे. ते तुम्ही मग फेडून टाका. हे तुमचे प्रारब्ध आहे. त्याला तुम्ही जबाबदार नाही.'' मग आता काय करू? म्हणून श्रीबाबांना विचारू लागले. श्रीबाबा म्हणाले की, काहीच झाले नाही असे समजून आता पूर्वीप्रमाणे सर्व करा. तात्पर्य काही झाले तरी प्रारब्ध आहे हे कबूल करावेच लागेल. ऐन संकटाच्यावेळी संताशिवाय कोणी उपयोगी पडणार नाही. एकदा एका मनुष्याचा मुलगा गेला तेव्हा स्मशानातून थेट तो श्रीरा. परमहंसाकडे धावत गेला व म्हणाला, जगतात आज माझे समाधान करणारे आपल्याशिवाय कोणी नाही. सारांश –

**'साधुसमागम निववी भवदवतप्तां तसे न अमृतसर।**
**सुख साधु संगतीचे मोक्षसुखाचाही पाडिते विसर।।'**

मोरोपंत हे प्रारब्धाचे भोग अनिवार आहेत ते भोगलेच पाहिजे. आज आमच्या प्रारब्धात सिद्धारूढस्वामींच्या दर्शनाला जावयाचे आहे. त्यांचे स्तवन झाले आहे. अशा सत्पुरुषांचे

स्तवन करणे सहज नाही. ज्याची कथा तोच वर्णन करू शकेल. तेव्हा श्रीभाईंनी हे स्तवन करविले आहे. ते त्यांच्या चरणी अर्पण करू.

**हुबळी ग्रामी जाऊ चला आरूढा घरा।**
**स्वामीकृपे लाहूं सुखे सद्भक्तीचा झरा।।१।।**
**शिवावतार हा प्रत्यक्ष वाटतो खरा।**
**तत्कृपेची अचल शांती ये सुखें घरा।।२।।**

अचल शांति ती संतकृपेने तुम्हास सहज साधेल.

**अक्षय शांतीचा सुखदाता। केशव कवी म्हणे आता।।**
**सोमवार भेटींलागी साधला बरा।**
**कैलास लीला पाहात मनी विस्मित इंदिरा।।३।।**
**कैलासातील ही लीला पाहून इंदिरा लक्ष्मी थक्क झाली.**
**श्रीवैकुंठी श्रीकैलासीं वास हरिहरा।**
**द्वैतभाव त्यजुनि भजूं रमा–उमावरा।।४।।**

शिव विष्णुच्या हृदयात म्हणून तो वैकुंठात आहे व विष्णू शिवाच्या हृदयात म्हणून तो कैलासात आहे. ते परस्परांकडे असतात अर्थात ते एकरूप आहेत. तेव्हा तुम्हीपण त्यांच्यातील द्वैतभाव सोडून द्या व अद्वैतभक्तीने त्यांची भक्ती करा.

◈ ◈ ◈

।। श्री सद्गुरुभ्योनमः।।

# आषाढ, श्रावण, भाद्रपद (जुलै ते सप्टेंबर) महिन्यातील उत्सव व महोत्सव

आषाढ महिन्याची सुरुवात जून महिन्यात झाली आहे.

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. २९.६.२०२३ | आषाढी एकादशी. देवशयनी एकादशी. |
| सोमवार | दि. ३.७.२०२३ | आषाढी पौर्णिमा - गुरुपौर्णिमा. ११.३० वाजता गुरुपादुकास एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता परमार्थ दिपिका वाचन. |
| बुधवार | दि. ५.७.२०२३ (आषाढ वद्य द्वितीया) | परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाईंची जयंती. सकाळी १०.०० वाजता जन्मोत्सव. पाळणा व इतर पदे. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| शुक्रवार | दि. ७.७.२०२३ (आषाढ वद्य पंचमी) | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सांयकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| रविवार | दि. ९.७.२०२३ | नामसंकीर्तन. संध्याकाळी ५.३० वाजता |

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. १५.७.२०२३ (आषाढ वद्य त्रयोदशी) | संत श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. |
| रविवार | दि. १६.७.२०२३ (आषाढ वद्य चतुर्दशी) | संत श्री सावतामाळी पुण्यतिथी. |
| | **: ऑगस्ट :** | |
| मंगळवार | दि. १.८.२०२३ | गुरुवर्य श्री भाईंची इंग्रजी तारखेप्रमाणे जयंती. यावर्षी श्रावण अधिक आल्यामुळे श्रावण महिन्यातील उत्सव महोत्सव थोडे पुढे झाले आहेत. |
| | **: श्रावणमास :** | |
| रविवार | दि. २७.८.२०२३ (श्रावण शुद्ध ११ एकादशी-पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाई जयंती दिन. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव. पाळणा व इतर पदे. |
| बुधवार | दि. ३०.८.२०२३ (श्रावण पौर्णिमा) | रक्षाबंधन. सकाळी १०.०० वाजता श्रावणी. |
| गुरुवार | दि. ३१.८.२०२३ (श्रावण वद्य प्रतिपदा) | श्री सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी. |

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. ६.९.२०२३ (श्रावण वद्य सप्तमी) | श्री लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. तसेच श्रीकृष्ण जयंती. श्री ज्ञानेश्वर महाराज जयंती. रात्रौ १०.३० वाजता श्री रमावल्लभ दासांची पदे व रात्रौ १२.०० जन्मोत्सव पाळणा व इतर पदे. |
| गुरुवार | दि. ७.९.२०२३ (श्रावण वद्य अष्टमी) | गोपाळकाला. सद्भक्ति मंदिराचा वर्धापन दिन. ११.३० वाजता एकादशणी. |
| | **: भाद्रपद मास :** | |
| मंगळवार | दि. १९.९.२०२३ (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) | श्री गणेश चतुर्थी. |
| सोमवार | दि. २५.९.२०२३ (भाद्रपद शुद्ध एकादशी) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी. |
| शनिवार | दि. ३०.९.२०२३ (भाद्रपद वद्य प्रतिपदा) | सद्गुरु श्री दादाभाईंचा महालय दिन. ११.३० वाजता एकादशणी. |
| | **: ऑक्टोबर :** | |
| मंगळवार | दि. १०.१०.२०२३ (भाद्रपद वद्य ११) | श्री बलभीम महाराज पुण्यतिथी दिन. |

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १५.१०.२०२३<br>(आश्विन शु. १) | घटस्थापना नवरात्रारंभ. सायंकाळी दुर्गास्तोत्र, नवरात्र उपासना व कलौचंडी विनायको वाचणे. |
| सोमवार | दि. २३.१०.२०२३<br>(आश्विन शु. ९) | श्री रामेश्वर मंदिरात सद्भक्ति मंदिरातर्फे रंगपूजा, आरती, प्रसाद. |
| मंगळवार | दि. २४.१०.२०२३<br>(आश्विन शु. ९) | विजयादशमी.<br>सद्भक्ति मंडळाचा वर्धापनदिन. श्री गुरुपादुकास एकादशणी सकाळी ११.३० वाजता. |
| **: प.पू. गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव :** | | |
| शनिवार | दि. २८.१०.२०२३<br>(आश्विन पौर्णिमा) | कोजागिरी पौर्णिमा |
| मंगळवार | दि. ३१.१०.२०२३<br>(आश्विन शु. ३) | श्री भाई व श्री बाळेकुंद्री महाराज पुण्यतिथी दिन. एकादशणी सकाळी ११.३० वाजता. रात्रौ ८.३० वा. शेजोत्सव. |

**विशेष सूचना :–** प्रत्येक उत्सत्वाचे दिवशी सकाळी स्तवन व प्रार्थना केली जाते.

✦✦✦

# शोकवृत्त

श्री. विनायक गजानन इसळूर ह्यांनी १३ एप्रिल २०२३ रोजी देह ठेवला. ह्यांचे पिताश्री कै. गजानन शंकर इसळूर हे प. पू. श्री भाईंचे आणि पुढे प. पू. श्री दादाभाईंचे निस्सीम भक्त असल्यामुळे श्री. विनायक देखील लहानग्या वयापासून सद्भक्ती मंदिरात नित्यनेमाने येत असत. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी सद्भक्ती मंदिरात सेवा केली. ह्यांचे काका कै. वामनराव शंकर इसळूर देखील श्रीभाई आणि श्री दादाभाई ह्यांचे भक्त होते. ह्या दोन्ही भावंडांना श्री टाकी महाराजांनी पादुका दिल्या आहेत. ह्या पादुकांची रोज नित्यनेमाने पूजा होते. त्यावर अभिषेक केला जातो. श्री विनायकरावांची पत्नी गु. भ. विद्या म्हणतात की ह्या पादुका नक्की कुणी दिल्या, म्हणजे श्रीभाई की श्री दादाभाई हे ठाऊक नाही. पण ह्या पादुका प्रत्यक्ष श्री दत्तगुरुंच्या आहेत ह्या भावनेने दोन्ही इसळूर कुटुंबात ह्या पादुका जीवापाड जपल्या जातात, पूजिल्या जातात. श्री. विनायकराव हे ठाणे येथील प्रसिद्ध ग्लॅक्सी कंपनीत वरिष्ठ रसायन विश्लेषक म्हणून काम पाहात होते.

सद्भक्ती मंदिरातील श्रेष्ठ आणि ज्येष्ठ अशा सद्भक्तांपैकी अजून एक तारा निखळला.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

✦✦✦

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) ज्याप्रमाणे श्री एकनाथ महाराजांच्या प्रसादाने श्री तुकाराम महाराज, श्री वामन पंडित आदि करून प्रेमळसंताच्या हातून ह्या भक्तीचा प्रसार महाराष्ट्रात झाला आहे. त्याचप्रमाणे श्री नारायण महाराजांच्या प्रेरणेनेच श्रीबाबांच्या अध्यक्षतेखाली सद्भक्ति प्रसारक मंडळीकडून तो सर्व जगतात व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. कारण सद्भक्ति म्हणजे गुरुभक्ति असून या मंडळीकडून जितके इंग्रजी व मराठी लेख प्रसिद्ध झाले आहे त्या सर्वांचे व तसेच या सद्भक्ति मंदिरात होणाऱ्या भजन, पूजन, कीर्तन, प्रवचनादि सर्व हरिसेवेचे तत्त्व हीच गुरुभक्ति होय हे निर्विवाद आहे.

२) आमच्या पुराणातील सर्वास माहित आहे अशी एक गोष्ट ही की, दुर्योधनास जगामध्ये कोणीच चांगला मनुष्य दिसत नव्हता. तसाच धर्मराजास कोणीही वाईट दिसत नव्हता. याचे कारण असे आहे की, प्रत्येक मनुष्य आपल्या प्रकृतीपासून उत्पन्न होणाऱ्या सत्त्व, रज व तम ह्या तिन्हीही गुणानुरूप काही बऱ्या वा काही वाईट क्रिया करीत असतो. यापैकी पूर्वसंस्काराने दुर्योधनाचे लक्ष वाईट गुणांकडे जात असून धर्मराजाचे चांगल्या गुणांकडे जात असे.

३) मनुष्याच्या हातून सर्व बऱ्या-वाईट होणाऱ्या कर्मांची जबाबदारी प्रकृतीच्याच माथी असून तिच्यापर म्हणजे पलीकडे असणारा आत्मा निर्गुण, निष्क्रिय, निराकार आहे असे जो पाहतो तो डोळस समजावा.

४) नामाची शक्ती एवढी आहे की पातक केवढेही मोठे असले तरी नामसंकीर्तन त्याचा समूळ नाश करून नाम घेणाऱ्यास सत्त्वशुद्धिद्वारा भक्ती, ज्ञान, वैराग्य व सगुणमुक्ति किंवा वैकुंठवास सहज प्राप्त करून देते.

५) या कलियुगात एकाग्र होऊन हरिनाम घेतले तर सर्व पापताप पळून जातील. नामाच्या ठिकाणी एकदा विश्वास बसून त्याची पुरी रूचि लागली म्हणजे कोणत्याही प्रकारच्या साधनाची किंवा विचाराची जरूर राहत नाही. नामानेच चित्तशुद्धि होते. त्याचप्रमाणे नामानेच सच्चिदानंदाचा लाभही होतो.

६) परमेश्वराचे प्रेमपुरस्सर आभार माना. त्याचे नाम घेऊन त्याची करूणा भाका. कीर्तन वगैरेंच्या द्वारे त्याच्या लीलांच्या ज्ञानाचा लोकांत प्रसार करा. त्याचे गुणानुवाद गा, स्तोत्रे वगैरे गाऊन त्याचे स्तवन करा. सर्व सृष्टीत दिसणाऱ्या व मन थक्क करून सोडणाऱ्या परमेश्वराच्या प्रभावाचे कथन करून त्याच्या पवित्र नामाचा गौरव करा. ईश्वराची भेट व्हावी अशी ज्यांची उत्कट इच्छा आहे. त्यांनी त्याचे प्रेमानंदाने भजन करावे.

७) पवित्र स्वर, अक्षरे नामे, मंत्र इत्यादी उच्चारताना हवेत जे तरंग उत्पन्न होतात त्यांच्या अंगी अद्भूत शक्ति असते.

८) एखादा अगदी नास्तिक मताचा मनुष्य असला तरी त्यालाही ईश्वराचे नाम घेणे श्रेयस्कर आहे. कारण, नाम कोणीही व कसेही घेतले असता त्याचे आपोआप होणारे अबाधित फळ चित्तशुद्धि हे आहे.

✦✦✦

## : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबईबाहेर, काही महाराष्ट्राबाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरुवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

**Name of the account : SADBHAKTI PRASARAK MANDALI**

| | | |
|---|---|---|
| **Bank Name** | : | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | : | 006100100000130 |
| **IFSC Code No.** | : | NKGS0000006 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 60. |
| | | **OR** |
| **Bank Name** | : | Bank Of India |
| **Account No** | : | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | : | BKID0000164 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 60. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.

**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor,
Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East),
Mumbai : 400 069.

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **मोबाईल :** | **९८२०३५०८६७**<br>**9820350867** |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **मोबाईल :** | **९८२१२७०७७२**<br>**9821270772** |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **मोबाईल :** | **९२२३२२२२४५**<br>**9223222245** |

✦✦✦